**वादी तर्फे सा.क्र.२ चा अतिरिक्त सरतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.**

६. आता मला दि.०८.०५.१९९५ रोजीच्या दस्ताची मूळ करारपत्रावरुन माझ्या समक्ष काढलेली छायांकित प्रत दाखवली. त्यावरती माझी स्वाक्षरी आहे. मी त्यावरील इतरांच्या स्वाक्ष–या ओळखतो. त्याला **नि. क्र.८२** देण्यात येतो. (सदर दस्ताला निशाणी क्रमांक देण्यास प्रतिवादीच्या विधिज्ञांतर्फे आक्षेप घेण्यात आलेला आहे. वादीच्या वकिलांनी सादर केलेल्या *२०१७ (५) महा. लॉ जर्नल ८६३* मधील निष्कर्षाप्रमाणे निशाणी क्रमांक बाबतचा मुद्दा अंतिम युक्तिवादासाठी खुला ठेवून त्याला निशाणी क्रमांक देण्यात येत आहे.)

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी तर्फे उलट तपास – श्री. एम. जी. बडदारे वकील.**

७. मडिलगे गावामध्ये माझे आजरा–गडहिंग्लज रस्त्यावरती 'हॉटेल हनुमान' आहे. मी ते हॉटेल सन १९७७ पासून चालवत आहे. मडिलगे गावात माझे सर्वात जुने हॉटेल आहे. माझे हॉटेल स्टँडसमोर असल्यामुळे त्यामध्ये संपुर्ण दिवसभर गर्दी असते. त्यामुळे मला हॉटेलमध्ये कोण येते जाते याकडे जास्त लक्ष नसते. माझा हॉटेल व्यवसाय बाराही महिने चालू असतो. त्यामुळे मला बाहेर जाऊन इतर काही करता येत नाही.

८. माझा खेडे या गावाशी कोणताही संबंध येत नाही. मी केवळ मालखरेदी करण्या पुरता आज–यात येत असतो. माझा या दाव्यातील वादी, प्रतिवादी आणि सावंत यांच्याशी कधीही संबंध आलेला नाही. मी हॉटेल व्यवसायात व्यस्त असल्यामुळे इतरांची घर, शेतमिळकत व वाहनखरेदीच्या व्यवहारात मध्यस्थी करत नाही. मला प्रतिवादीच्या गरजांबाबत पुर्ण माहिती नाही.

९. मला प्रतिवादीने कधीही त्याची मिळकत विकायची आहे याबाबत सांगितले नव्हते. माझी व वादीची देखील जास्त बोलाचाली नसून त्याच्या जमिनींबाबत माहिती नाही. मी खेडे येथील माझ्या जमिनी व्यतिरिक्त इतरांच्या जमिनी पाहिलेल्या नाहीत. माझी खेडे येथे गट क्र.२८५ मध्ये जमीन आहे. मला वादी व प्रतिवादीमध्ये कधी व काय चर्चा झाली याची माहिती नाही. मी त्यांच्या कोणत्याही व्यवहारात पुर्वी सहभागी नव्हतो. मी आताही त्यांच्या व्यवहारात सहभागी नाही.

१०. माझ्यासमक्ष वादी व प्रतिवादी मध्ये खरेदीवेळी पैशांचा व्यवहार झाला होता. त्याबाबतचे

माझ्या समक्ष खरेदीपत्र झाले होते. याव्यतिरिक्त माझ्या समक्ष त्यांच्यामध्ये इतर कोणताही व्यवहार झाला नव्हता. माझ्या शपथपत्रातील संपुर्ण मजकूर वादीने तयार करुन आणला आहे. त्यांनी मला दाखल करायचा आहे असे सांगून माझ्यातर्फे न्यायालयात हजर केला आहे.

**११**. मी ते शपथपत्र वादीने करुन आणल्यावर न्यायालयात हजर केले आहे. त्यामध्ये वादीने मी खरेदीपत्रावर सही केली असा खरा मजकूर लिहिला आहे. मला ज्या दिवशी खरेदीपत्र केले त्याच दिवशी त्याचा वादीने मूळ दस्त दाखवला होता. मला त्यानंतर आजपर्यंत तो मूळ दस्त पाहण्याचे कारण घडले नाही. मला दाखवलेला नि. क्र.८२ चा दस्त त्यांनी ज्या दिवशी केला होता तोच आहे.

**१२**. मला खरेदीपत्र व करारपत्रा मधील फरक समजतो. नि. क्र.८२ चा दस्त करारपत्राचा आहे. प्रश्न – तुम्हाला वादीने खरेदीपत्राचा दस्त दाखवला होता ?

उत्तर – मला त्याने नि. क्र.८२ चा दस्त दाखवला होता.

**१३**. तो दस्त १९९५ साली झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी १९९५ साली झालेल्या वादीच्या कोणत्याही दस्ताला हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, त्या दस्तावरती माझ्यासमोर वादी, प्रतिवादी व सावंत यांनी स्वाक्ष–या केल्याचे मी खोटे सांगत आहे. ३० वर्षांपूर्वी आजरा शहरात झेरॉक्स मशीन नव्हती. मला नि. क्र.८२ ची प्रत नंतर कोणी काढली याची माहिती नाही. मला नि. क्र.८२ चा मूळ दस्त आजही कोणाकडे आहे याची माहिती नाही.

**१४**. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र.८२ प्रमाणेचा दस्त माझ्यासमोर झाला नव्हता. मला वादी व प्रतिवादीमध्ये केव्हा व काय पैशांचे व्यवहार झाले याची माहिती नाही. मला ते व्यवहार कशाबाबत झाले होते याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र.८२ प्रमाणे माझ्यासमोर कोणताही दस्त झालेला नाही.

**१५**. मला या प्रकरणात साक्ष देण्यासाठी दोन वर्षांपूर्वी न्यायालयाचे समन्स मिळाले होते. मी तेव्हापासून वादीबरोबर चर्चा करुन न्यायालयात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या सांगण्यावरुन खोटे शपथपत्र दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०७.०८.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.